**MHKO120002642020**

# निशाण क्रमांक ०५ वरील आदेश.

( शुभांगी ठाणेकर वि. संजीवकुमार सूर्यवंशी-पाटील वगैरे )

वादीने सदर अर्ज प्रतिवादींविरुद्ध दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ अन्वये तूर्तातूर्त मनाईकरीता दाखल केला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन :-**

०२. अर्ज कलम ०१ मध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या मौजे मडिलगे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील गट क्र. ११९७ व ११८० ('' **दावा मिळकती** '' संक्षिप्त करिता)

**थोडक्यात वादीचे कथन पुढील प्रमाणे,**

०३. वादी व प्रतिवादी क्र.३ हे सख्खे भाऊ बहिण असून, प्रतिवादी क्र.२ हे त्यांचे जनक पिता आहेत व प्रतिवादी क्र.४ ह्या त्यांच्या आई आहेत. दावा मिळकती ह्या वादी कुटुंबाच्या शेत जमिनी असून त्यांचे अद्यापही सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. प्रतिवादी क्र.२ यांचा स्वभाव चैनीखोर असून त्यांनी त्यांच्या वैयक्तिक चैनीसाठी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडून व्याजाने पैसे घेतले होते. सदर कर्जाचा पैसा प्रतिवादी क्र.२ यांनी स्वतःच्या विलासी जीवनासाठी वापरला आहे. सदर कर्जाबाबत वादींना कोणतीही कल्पना नव्हती. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या कर्जाच्या वसुलीसाठी जबरदस्तीने प्रतिवादी क्र.२ यांच्याकडून बेकायदेशीरपणे दावा मिळकती खरेदी घेतलेल्या आहेत. याबाबत वादींनी पोलिसात तक्रार देखील केली आहेत. तसेच, प्रतिवादी क्र.२ यांना त्यांच्या वैयक्तिक कर्जापोटी वादी व इतर प्रतिवादींचा हिस्सा विक्री करण्याचा कोणताही अधिकार नव्हता. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना करून दिलेले खरेदीपत्र वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही. दावा मिळकती ह्य प्रतिवादी क्र.२ यांच्या वडिलोपार्जित मिळकती असल्यामुळे त्यामध्ये

वादी व प्रतिवादी क्र.३ व ४ यांचा हिस्सा येत आहे. म्हणून दिनांक ०५/०२/२०२० रोजी वादींनी प्रतिवादी क्र.२ यांच्याकडे दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा मागितला असता, प्रतिवादी क्र.२ यांनी त्याला नकार दिला आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकती अन्य लोकांना विक्री किंवा तारण गहाण बोजा निर्माण करतील. सबब, वादीने प्रस्तुत अर्ज दाखल करून प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकती अन्य कोणासही विक्री करू नयेत, गहाण, तारण देवू नयेत किंवा त्यावर कोणाताही बोजा निर्माण करू नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश प्रतिवादी क्र.१ विरुद्ध होण्याची विनंती वादीने केली आहे.

०४. प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी क्रमांक २० वर तूर्तातूर्त मनाई अर्जास म्हणणे दाखल करून अर्जातील मजकूर नाकारलेला आहे. थोडक्यात प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, प्रकरणातील दावा मिळकतींचे वर्णन चुकीचे असून आवश्यक पक्षकारांना प्रकरणात सामील करण्यात आलेले नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्याकडून दिनांक ०७/०१/२०१९ रोजी नोंदणीकृत खरेदीदस्त क्र.४१/२०१९ नुसार रक्कम रूपये ५,७६,०००/- च्या मोबदल्यात खरेदी घेतलेल्या आहेत व तेंव्हापासून प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतींच्या प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत असून त्यात ते वेगवेगळी पिके घेत आहेत. सध्या दावा मिळकतींचे बाजारभाव वाढले असल्यामुळे आर्थिक अभिलाषेपोटी वादी व प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी संगनमताने प्रस्तुत दावा दाखल केला आहे. सबब, प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एच. कडव, तसेच प्रतिवादीतर्फे विधिज्ञ एस. डी. भोसले यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील परिस्थितीचे अवलोकन केले असता, खालील प्रश्नबिंदू माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिद्ध करतात काय ? | : | होकारार्थी. |
| २. | सोईचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | : | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ३. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल काय ? | : | होकारार्थी. |
| ४. काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

०६. प्रस्तुत प्रकरणी वादीने निशाणी क्र.३ सोबत, दावा मिळकतीचे ७/१२ उताऱ्यांची प्रत, दिनांक १४/०७/२०२० रोजीच्या खरेदीखताची प्रत हजर केली आहे. तसेच, निशाणी क्र.२९ सोबत दावा मिळकतीचे ७/१२ उताऱ्यांची प्रत हजर केली आहे. तसेच, निशाणी क्र.३१ सोबत दावा मिळकतींचे फेरफार उतारे व ७/१२ उताऱ्यांची प्रत हजर केली आहे.

०७. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र.१ ने त्यांच्या वतीने कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत.

**<u>प्रश्नबिंदु क्रमांक १ ते ३ करिता</u>, ( प्रथमदर्शनी केस सोईचा समतोल अपरिमीत नुकसान)**

०८. सकृतदर्शनी केस बघताना न्यायालयास एक गंभीर व प्रामाणिक वाद दाव्याच्या न्यायचौकशी करिता उपस्थित करण्यात आला आहे काय? हे तपासावे लागते. सकृतदर्शनी केस सिद्ध करण्याकरिता वादीस दाव्याच्या गुणदोषांवर सिद्ध करावयाची केस सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. प्रस्तुत अर्जावर विचार करताना न्यायालय अभिलेखावर दाखल शपथपत्र व इतर कागदोपत्री पुरावा त्यांच्या औपचारिक सिद्धतेशिवाय विचारात घेवू शकतो.

०९. वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एच. कडव यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांच्या वैयक्तिक चैनीसाठी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडून व्याजाने पैसे घेतले होते. सदर कर्जाबाबत वादींना कोणतीही कल्पना नव्हती. प्रतिवादी क्र.१

यांनी त्यांच्या कर्जाच्या वसुलीसाठी जबरदस्तीने प्रतिवादी क्र.२ यांच्याकडून बेकायदेशीरपणे दावा मिळकती खरेदी घेतलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.२ यांना त्यांच्या वैयक्तिक कर्जापोटी वादी व इतर प्रतिवादींचा हिस्सा विक्री करण्याचा कोणताही अधिकार नव्हता. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना करून दिलेले खरेदीपत्र वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही. दावा मिळकती ह्य प्रतिवादी क्र.२ यांच्या वडिलोपार्जित मिळकती असल्यामुळे त्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र.३ व ४ यांचा हिस्सा येत आहे.

१०. वादींनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.२९ अ. क्र.१ व २ सोबत गट क्र.११९४ व ११८० चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर उताऱ्याचे अवलोकन केले असता, भोगवटदार सदरी वादीच्या पुर्वहक्कदारांची नावे असल्याचे दिसून येत आहे.

११. याउलट, प्रतिवादी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. एस. डी. भोसले यांनी असा युक्तिवाद केला की, प्रकरणातील दावा मिळकतींचे वर्णन चुकीचे असून आवश्यक पक्षकारांना प्रकरणात सामील करण्यात आलेले नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्याकडून दिनांक ०७/०१/२०१९ रोजी नोंदणीकृत खरेदीदस्त क्र.४१/२०१९ नुसार रक्कम रुपये ५,७६,०००/- च्या मोबदल्यात खरेदी घेतलेल्या आहेत व तेंव्हापासून प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतींच्या प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत असून त्यात ते वेगवेगळी पिके घेत आहेत.

१२. मान्य परिस्थितीनुसार, दावा हा नजीकच्या काळामध्ये लवकरात लवकर निकाली निघणे शक्य नाही. दावा प्रलंबित असताना जर दावा मिळकती ह्या अन्य कोणासही हस्तांतरित केल्यास दाव्यामध्ये गुंतागुंत वाढू शकते. तसेच, बहुविध दाव्यांची संख्या वाढू शकते. तसेच, निशाणी क्र.२८ खाली दाखल करण्यात आलेलया दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यांचे व निशाणी क्र.३० खाली दाखल करण्यात आलेल्या फेरफार उताऱ्यांचे अवलोकन केले असता, दावा मिळकती ह्या वादी यांच्या वडिलोपार्जित मिळकती असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादीच्या

बाजूने असून सोईचा समतोल वादीच्या बाजूने आहे भविष्यात दावा मिळकती हस्तांतरित झाल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल. परिणामतः मी प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ यांना होकारार्थी निष्कर्ष नोंदवितो व न्यायाचे उद्दिष्ट साधण्याकरिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१. तूर्तातूर्त मनाई अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

अ. प्रतिवादी क्र.१ यांनी, किंवा त्याच्या मार्फत कोणत्याही इसमाने दाव्याचा अंतिम निकाल लागे तोपर्यंत, दावा मिळकती ह्या, अन्य कोणासही विक्री करू नयेत, गहाण, तारण देवू नयेत किंवा त्यावर कोणाताही बोजा निर्माण करू नये, असा तूर्तातूर्त मनाई आदेश देण्यात येत आहे.

ब. खर्चाचा आदेश मूळ दाव्यात समाविष्ट करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.05.02 17:25:28 +0530

स्थळ : गारगोटी. **( व्ही. बी. मुल्ला )**

दिनांक : ०२/०५/२०२३. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.